<u>‘साठवणीतल्या’ लता मंगेशकर</u>

लता मंगेशकर हयांच्या आयुष्यातली साठहून अधिक वर्षे पार्श्वगायनाच्या क्षेत्रात गेली. त्यांच्या गाण्याविषयी□आवाजाविषयी व एकूण कारकीर्दीविषयी भरभरून लिहिले गेले आहे. तेच ते असले तरीही हया पुढंही पुन्हा पुन्हा लिहिले जाणार आहे. त्यांची बहुतेक सर्व गाणी ध्वनिमुद्रित झालेली आहेत. अश्या ध्वनिमुद्रित संगीताच्या साठवणुकी विषयी मात्र खूप कमी लिहिले गेले आहे. अश्या प्रयत्नांची नोंद घेणे आवश्यक आहे.

१९९० पर्यंत असा काही उप□म कोणीही हाती घेतला नव्हता. विविध भाषांतल्या हजारो गाण्यांचे आकडे तेवढे अगदी ‘गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये कोणत्याही पुराव्याशिवाय प्रसिद्ध झाले होते. त्याची दुरूस्ती पण झाली. नोंद मागे घेण्यात आली. तरीही तेच आकडे अद्यापही रेटून वापरात आहेत. ते टी. व्ही. वाहिन्या व वर्त मानपत्रांत अगदी काल परवा पण प्रकाशित झाले. विश्वास नेरूरकर हयांनी सिद्ध केलेल्या ‘गंधार’ हया गीत कोषामुळे वस्तुस्थिती समोर आली असूनही त्यात सुधारणा नाही. ऊलट छत्तीस भाषांतून पन्नास हजार गाणी असं अगदी शासनाच्या सहयाद्रीसह अनेक वाहिन्यांवर सांगितले गेले. अजूनही नोंदींबाबतच्या बेफिकिरीची कुणालाच ना खंत ना खेद.

काही वर्षांपूर्वी सोलापूर येथील संग्राहक जयंत राळेरासकर हयांच्या कडे गेलो होतो. त्यांचा मुलगा निखिल माझ्याकडून रेकॉर्डस विषयी माहिती समजावून घेत होता. काका मला हयात काय करता येईल असे विचारता समोरच असलेल्या ‘गंधार’ ची प्रत मी त्याला दाखवली. हया सूचीतली गाणी गोळा करता येतात का पहा असे मी त्याला सुचवले. विसरून पण गेलो. पण तो विसरला नव्हता. शाळकरी मुलगा निखिल कॉलेजात जाऊ लागला तोवर त्याने कोषातली सुमारे नव्वद टक्के म्हणजे पाच हजार गाणी गोळा केली होती. ती आज गानरसिकांना उपलब्ध आहेत. ही अशी काही कामं म्हणजे खरीखुरी प्रकाशाची बेटं आहेत.

आमचा आणखी एक रेकॉर्ड कलेक्टर मित्र सुमन चौरसिया □हे नाव पुरूषाचे आहे□ लताजींच्या गाण्याचा भक्त. मुंबईच्या चोर बाजारात भेटायचा. लताजींच्या नावानं इंदूर पासून चाळीस मैलावर महूपाशी संग्रहालय उभारण्याचा संकल्प बोलून दाखवायचा. आम्ही हसण्यावारी न्यायचो. त्याने मात्र २००८ साली लता दीनानाथ मंगेशकर रेकॉर्ड संग्रहालय पिगडम्बर गावात दोन मजली इमारतीमध्ये उभारले. तिथे साडेसात हजारांहून अधिक

ध्वनिमुद्रिका विसावा घेत गान रसिकांच्या प्रतिक्षेत आहेत . लताजींच्या गाण्यांवरचे 'बाबा तेरी सोन चिरैय्या' हे कोषासारखे पुस्तक संग्रहालयातर्फे प्रकाशित करण्यात आले आहे .

असाच एक ध्येयासक्त संगीत शिक्षक कोलकाता येथे आहे . स्नेहाशिष चतर्जी असं त्याचं नाव . लताजींनी गायिलेल्या गाण्यांचे शब्दांसहित कोष प्रकाशित करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याच्या कामात गेली ३२ वर्षे त्याने स्वतःला झोकून दिलेले आहे . मराठी व बंगाली गीतांचे कोष प्रसिद्ध झाले असून इतर खंडांचे काम सुरू आहे . मागणी येईल तेवढया प्रती ते बनवून घेतात . लताजींच्या स्वरांचे गारूड हे असे आहे . इंटरनेटचा काहीही मागमूस नसतांना हया अवलियांनी हे काम हाती घेतले . त्यातल्या यशापयशाची अजिबात पर्वा न करता ते अखंड चालूच आहे .

२०१० पासून 'सोशल मिडिया' व नेटवर्किंग मुळे हया साठवणुकीला एक नवीन परिमाण लाभले आहे . ते काम चटदिशी सर्वदूर पोहोचणारे व तरूणाईला आकर्षित करून घेणारे आहे . लताजी गेल्या त्याच दिवशी 'स्पॉटिफाय' हया संगीताचे ऑनलाइन वाटप करणा या अमेरिकन कंपनीने त्यांच्या ९७ गाण्यांची प्ले लिस्ट प्रकाशित केली . त्यात महल मधल्या 'आयेगा आनेवाला' पासून मोहब्बते मधल्या गाण्यांचा समावेश आहे . त्याला चोवीस तासांच्या आत पन्नास हजार श्रोत्यांनी भेट दिली आहे . हया कंपनीचे लाखो वर्गणीदार असून दहा हजार कर्मचारी काम करतात .

त्या गेल्या त्या क्षणापासून व्हॉटसअप विद्यापीठात संदेश पाठवायला व यू टयूब वरची गाणी अपलोड करायला उधाणच आलेले आहे . वर पुन्हा भावपूर्ण आदरांजली . ते ओसरायला काही दिवस जावे लागतील . मग लक्षात येईल की आपण पुढे पाठविलेल्या गाण्याचा एक आवाज सोडला तर बाकी फारसा काही तपशील आपल्याला ठाऊकच नाही . बघायची इच्छा समजा चुकून झालीच तर कुठे शोध घ्यायचा ते पण माहीत नाही . सवयीनं मोबाईलवरची बोटं शोध घेऊ लागली तर 'माय स्वर' व 'डिस्कॉगस' हया संकेतस्थळांवर विसावतील . दोन्ही स्थळं गेल्या दहा बारा वर्षातली व सतत विकसित होत चाललेली . अगदी यूजर फ्रेंडली . 'माय स्वर' देशी व केवळ हिंदी चित्रपट संगीताला वाहून घेतलेलं तर 'डिस्कॉगस' अमेरिकन . जागतिक संगीताच्या ऑडियो माध्यमाविषयीची सर्व माहिती एका जागी उपलब्ध करून देणारं . आपण एखादी ध्वनिमुद्रिका□कॅसेट वा सी . डी . पाहतो तेव्हां त्याच्या कव्हर वर छापलेली सगळी माहिती म्हणजेच 'डिस्कोग्राफी' इथं नोंदलेली आहे . उदा . शिवकल्याण राजा हया अल्बम ची माहिती मिळवण्याचा प्रयत्न

केला तर CDNF 145014 हया सी.डी.चे कव्हर दिसू लागते व त्यावरची सगळी माहिती एका ठिकाणी वाचता येते.हवे तर डाऊनलोड करून ठेवता येते.देशोदेशीच्या २५ लाखांहून अधिक अल्बमस ची माहिती येथे साठवलेली आहे.थोडे मेहनतीचे काम आहे पण अतिशय उपयोगाचे आहे.भारतातून फार थोडे असले तरी जगभरातून सुमारे सहा लाख जण हया कामात हौस वा छंद म्हणून फावला वेळ सत्कारणी लावीत आहेत.इथे लता मंगेशकर हयांच्या वर आजपर्यंत ५00 रेकॉर्डस कॅसेटस व सी.डी.ची नोंद आहे.आणखी बरीच मंडळी हयात सामील झाली तर ही संख्या वाढू शकते.

माहिती तर मिळाली पण गाणी ऐकायची कुठे?असंख्य पर्याय आहेत.काही चिरंजीवी तर काही अल्पजीवी.पण एका संकेतस्थळावरून दुसरे असे स्थलांतर अगदी सहज करता येते.त्यातलेच एक सॅन फ्रॅनसिस्को येथून गेली पंचवीस वर्षे काम करीत आहे.archive.org असे त्याचे नाव आहे.तिथे लता मंगेशकर हया नावाचा शोध घेतला तर पुन्हा ५00 संकेतस्थळे उघडतात व गाणी व त्यांची माहिती एका जागी वाचता व ऐकता येते.

एडिसनच्या शोधामुळे आवाज मुद्रित करण्याची सोय झाली.त्याला आता १४५ वर्षे पूर्ण होतील.लताजींचा मुद्रित आवाज साठवून ठेवण्याची इतकी सोय आता उपलब्ध आहे.नव्वद च्या आसपास एका टी.व्ही.मुलाखतीत ‘आमची गाणी पुढच्या पिढया ऐकतील का?’ असा रास्त सवाल खुद्द लताजींनीच विचारला होता.त्याचे प्रामाणिक उत्तर ‘नाही’ असेच आहे हे त्या सुद्धा जाणून होत्या.१९0२ पासूनची ध्वनिमुद्रणे सांभाळण्याचा प्रयत्न करताना आम्ही संग्राहकांनी हे अनेक बुजुर्ग गायक गायिकांचे बाबतीत प्रत्यक्ष अनुभवले आहे.पण कुणाला इच्छा झालीच तर ती गाणी मात्र विविध ठिकाणी उपलब्ध असणार आहेत हे नक्की.

सुरेश चांदवणकर,मुंबई

0८ फेब्रुवारी २0२२